बीड,जालना,छत्रपती संभाजीनगर,पुणे,रायगड,सातारा,सांगली,मुंबई,नाशिक येथून एकाचवेळी

दैनिक साप्ताहिक आपल्या सर्वांचे लोकप्रिय वृत्तपत्र

# अक्षर वार्ता

संपादक – संजय आ.हंगे
मो.९७६६२६८४१५

DAINIK SAPTAHIK AKSHAR VARTA

कार्यकारी संपादक – सुमन डापकर
मो.८७८८२५१११४

मुलगा पाहिजे

डीटीपी ऑपरेटर जॉबवर्कचे कॉम्प्युटरवर काम करणारा गरजूवंत मुलगा पाहिजे

संपर्क:–
८७८८२५१११४

बीड (महाराष्ट्र) वर्ष ५ वे, अंक १३ शुक्रवार २९ ऑगस्ट २०२५ RNI Reg.NO./2021/83381 Postel Regd No.L SB/Beed/RNP-257/2025-2027 E-mail : aksharwartanews@gmail.com पृष्ठे : ४ किंमत २ रुपये

BEED (MAHARASHTRA) Year 5 Issue 13 Friday 29 August RNI Reg.NO./2021/83381 Postel Regd No.L SB/Beed/RNP-257/2025-2027 E-mail :akasharwartanews@gmail.com Pages 4 Prise Rs

## “आरक्षणाबाबत अन्याय होणार नाही.” – मुख्यमंत्री

मुंबई वृत्तसेवा मराठा आरक्षणाच्या मागणीकरिता मराठा आंदोलक मनोज जरांगे हे मुंबईच्या दिशेने निघाले आहे. शुक्रवारी ते आझाद मैदानावर आंदोलनाला बसणार आहेत.याच मोर्चावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आरक्षणाबाबत कोणावरही अन्याय होणार नाही, असे आश्वासन त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिले आहे.

मराठा आणि ओबीसी या दोन्ही समाजासाठी शासन काम करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.देवेंद्र फडणवीस म्हणाले, माझी दोन्ही समाजाला विनंती आहे, दोन्ही समाजासाठी शासन काम करेल.

ओबीसी समाजाने लक्षात ठेवावे आम्ही सर्व प्रश्न सोडवू, मराठा समाजाचे प्रश्न आम्हीच सोडवले,



इतर कुणीही प्रश्न सोडवले नाहीत. मराठा समाजाला आपण आरक्षण दिले आहे आणि कोर्टात टीकलेले आहे, असे यावेळी फडणवीसांनी म्हटले. तसेच, लोकशाहीत प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे, आम्ही मराठा समाजाला आरक्षण दिले आहे. मी आणि एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असतानाच आरक्षणाचा प्रश्न सुटलेला आहे.तसेच, लोकशाहीत सगळ्यांना आपली मतं मांडण्याचा अधिकार आहे, आंदोलन करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे मी नेहमी एकच गोष्ट सांगतो की, लोकशाही पध्दतीने जेवढी आंदोलन होतील त्याला आम्ही सामोरे जाऊ. कुठलेही आंदोलन होवो, लोकशाहीच्या चौकटीबाहेर जाऊ नये, उच्च न्यायालयाने या आंदोलनासाठी काही नियम निकष तयार केले आहेत.पण मुळात हे आंदोलन का होत आहे, हेच मला कळत नाहीये. मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्यात आलेले आहे.

त्यांची ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी आहे, मात्र आधीच ओबीसीमध्ये ३५० जाती आहेत. मराठा समाजाला स्वतंत्र १० टक्के आरक्षण आहे. तरीही आंदोलकांशी चर्चा करु आणि उपाय काढू, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

## वाण नदी पात्रात दोन वाहने वाहून गेली एकाचा मृतदेह सापडला तर दुसऱ्याचा शोध अद्याप नाही

### महसूल व पोलीस प्रशासन व्यक्तीच्या शोधात तत्परतेने नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन

किल्लेधारूर (मनोज जगताप) वाण नदीचा उगम हा धारूर तालुक्यातून आहे या तालुक्यातून विविध रस्त्यावरून या नदीचे पात्र जाते धारूर ते असरडोह रस्त्यावर बुधवारी सायंकाळी एक कार वाहून गेल्याने एक व्यक्ती ही वाहून जाऊन त्याचा मृतदेह सापडला तर धारूर ते आडस रस्त्यावर आवरगाव नजीक नदीपात्रात रात्री बारा ऩतर एक ऑटो वाहून गेला आहे या मधील ऑटो चा शोध लागला मात्र संबंधित व्यक्तीचा शोध मात्र अद्याप लागलेला नाही याच्या शोधात प्रशासकीय यंत्रणा तत्परतेने कार्य करत आहे नागरिकांनी मात्र दक्षता बाळगण्याचे आवाहन महसूल प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

धारुर तालुक्यात बुधवारी रात्री जोरदार पाऊस झाला या अतिवृष्टीमुळे सर्व नदी नाले ओंसडून वाहत होते धारूर ते असरडोह रस्त्यावर रात्री आठच्या नंतर रुई धारूर कडून अज़नडोह कडे येणारी टाटा कंपणीची जस्ट गाडीत धारुर मोंढ्यात आडत दुकान असणारे व्यापारी नितिन शिवाजीराव कांबळे हे घरी जात असताना अंजनडोह ते रुईधारूर दरम्यान पुलावरून पाणी वाहत असल्याने



गाडीसह ते वाहून गेले

महसूलचे पथक नायबतहसीलदार सुरेश पाळवदे व पोलीसचे पथक सहायक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांचे नेतृत्वा खाली रात्री गावकरी व सामाजिक कार्यकर्त्यांचे मदतीने शोध घेतला मात्र हे रस्त्या पासून उत्तरेलाशंभर मिटर वरचे बंधारा चे बाजूला झाडाला अडकलेला नितिन कांबळे याचा मृतदेह मिळाला मात्र गाडी चा शोध मात्र लागला नाही.

या पुलाची उंची कमी असल्याने या पुलावरून थोडा ही पाऊस झाला तर जिव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो या घटने मुळे तालूका भयभीत असताना धारूर आडस रस्त्यावर आवरगाव जवळ वाण नदी पात्राचे पाणी ओसडून वाहत असल्याने अब़ाजोगाई हून आपला ऑटो रिक्षा दुरूस्ती करून धारूर कडे रात्री बारा नंतर येत असताना ऑटो सह नदी पात्रात अनिल बाबूराव लोंखडे वय २६ वर्ष रा सभ़ाजीनगर गोपाळपूर धारूर येथील हा वाहून गेला या घटनेतील ऑटो गुरूवारी सकाळी नदी पात्रात पन्नास फुटावर सापडला. महसूल व पोलीस यंत्रणा यानी या व्यक्तीचा शोध सुरू केला असून जिल्हा स्थानीक बचत पथक ही पाचारण केले असून हे शोध घेत आहे.

दुपारी उशीरा पर्यंत आवरगाव घटनेतील व्यक्तीचा शोध लागला नव्हता. शोध मात्र वेगाने सर्वत्र नदीपात्रात लाब पर्यंत शोध मोहीम सुरू होती या घटने मुळे मात्र सर्वत्र भितीचे वातावरण पसरले आहे.नागरीकानी दक्षता घ्यावी ‚नायब तहसीलदार पाळवदेतालूक्यातील नागरीकानी पुलावरून पाणी वाहत असेल तर आपले वाहण त्यावरून नेऊ नये.

आपली जिवाची सुरक्षीतता बाळगावी असे अवाहण नायब तहसीलदार सुरेश पाळवदे यानी केले आहे

## आझाद मैदान आंदोलकांनी गजबजले;

### वाहतुकीवर परिणाम शक्य, मराठा मोर्चा मुंबईच्या दिशेने

मुंबई वृत्तसेवा– मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे उद्या (ता. २९) आझाद मैदानात धडकणार आहेत. जरांगे यांचा मोर्चा मजल दरमजल करीत मुंबईच्या दिशेने आगेकूच करीत आहे. मराठा समाज उत्स्फूर्त या आंदोलनात सहभाग होत असल्याने गणेशोत्सव काळात मुंबईत येणाऱ्या या मोर्चाने मुंबईतील व्यवस्था विस्कळित होण्याची शक्यता आहे.आझाद मैदानासह आजूबाजूचा परिसर आजच गजबजला आहे.मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी २७ ऑगस्टला अंतरवाली सराटी येथून मुंबईकडे पदयात्रा सुरू केली आहे. बुधवारी रात्री शिवनेरी किल्ल्यावर दाखल होऊन तेथे त्यांनी मुक्काम केला. शिवनेरीवर शिवरायांचे दर्शन घेऊन सकाळी त्यांनी मुंबईकडे कूच केली आहे. उद्या ते आझाद मैदानात पोहोचून दुपारी दोन वाजेपासून उपोषणाला सुरुवात करणार आहेत.जरांगे यांचा भव्य मोर्चा आझाद मैदानात पोहोचण्यापूर्वीच आज त्यांचे हजारोच्या संख्येने कार्यकर्ते आझाद मैदानात जमले होते. कार्यकर्ते गटागटाने घोषणाबाजी करीत आझाद मैदानात दाखल होत होते. एक मराठा लाख मराठा,



आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे अशा घोषणांनी आझाद मैदानाचा परिसर दुमदूमत होता. काही कार्यकर्ते संपूर्ण फोर्ट विभागात फिरताना दिसत होते.मैदानात ५० बाय ५० फुटांचे व्यासपीठ बांधण्याचे तसेच अल्युमिनियमचे खांब जोडण्याचे काम सुरू होते. पोलिसांचा बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. पोलिसांची चिंता वाढत चालल्याचे दिसते आहे. आझाद मैदानाच्या पान २ वर...

## एका समाजाचे आरक्षण दुसऱ्या समाजाला देणे योग्य नाही; मंत्री बावनकुळे

नागपूर वृत्तसेवा : राज्य सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या भूमिकेवर ठाम आहे, पण कोणत्याही समाजाचे आरक्षण कमी केले जाणार नाही. एका समाजातून आरक्षण काढून दुसऱ्याला देणे योग्य होणार नाही.मात्र याबाबत काँग्रेसने आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करावी असे मत व्यक्त करत मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनावरून राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला.राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. आरक्षणाबाबत काँग्रेस नेत्यांची भूमिका नेहमीच गोंधळलेली आहे. राहुल गांधी म्हणतात,



ओबीसी आरक्षण कायम ठेवा, जातीय जनगणना करा. पण महाराष्ट्रातील काँग्रेसचे नेते ओबीसी आरक्षण काढून मराठ्यांना देण्याची भाषा करतात. त्यामुळे काँग्रेसने मराठा आरक्षणाबाबत – नक्की भूमिका काय? पान २ वर...

## लक्ष्मण हाकेंनी केली मोठी घोषणा, मनोज जरांगेंना थेट इशारा,

मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मराठा बांधव आता चांगलेच आक्रमक झाले आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आरक्षणासाठी आंदोलनाची हाक दिली असून, सर्व मराठा समाज मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात एकवटल्याचं पहायला मिळत आहे.मराठा समाज मुंबईच्या दिशेनं निघाला आहे. मुंबईच्या आझाद मैदानावर मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मोठं आंदोलन होणार आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळावं ही मराठा समाजाची प्रमुख मागणी आहे. त्यासाठीच आता मुंबईमध्ये आंदोलन करण्यात येणार आहे.दरम्यान दुसरीकडे मात्र ओबीसी नेत्यांकडून मनोज जरांगे पाटील यांच्या या मागणीला विरोध होत आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे पाटील यांच्याविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर प्रतिक्रिया देताना लक्ष्मण हाके यांनी आता थेट जरांगे पाटील यांना इशारा दिला आहे. त्यामुळे आता वातावरण चांगलंच तापण्याची शक्यता आहे.नेमकं काय म्हणाले हाके?मनोज जरांगे पाटलांची मागणी बेकायदा आहे, असा आरोप यावेळी लक्ष्मण हाके यांनी केला आहे. शासनाने त्यांना फॅक्ट समजून सांगितलं पाहिजे, नाहीतर महाराष्ट्रात अराजक निर्माण होऊ शकते, असा इशाराही यावेळी हाके यांनी दिला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले



की, मराठा तेवढा मेळवावा ओबीसी मुळासकट संपवावा, असाच जरांगेंच्या मागणीचा अर्थ होतो. ओबीसी जरांगेंच्या आंदोलनाल प्रति आंदोलन पुकारतील त्यांची संख्या जेवढी आहे त्याच्या दहापट संख्या महाराष्ट्राच्या रस्त्यावर उतरलेली दिसेल, अशी घोषणाही यावेळी हाके यांनी केली आहे.जरांगे कधी कोणाची स्तुती करतील आणि कोणाच्या रसदीवर आंदोलन उभं करतील याचा नेम नाही. अजित पवारांच्या आमदारांनी जरांगेंना रसद पुरवली, जरांगे पाटील मुख्यमंत्र्यांविरोधात खालच्या स्थरावर टीका करत आहेत, मात्र तरी देखील सत्तेतील माणसं जरांगे पाटलांना रसद पुरवत आहेत. ओबीसीच्या मंत्र्यांनी गट निर्माण करून मुख्यमंत्र्यांना बोललं पाहिजे, असंही यावेळी हाके यांनी म्हटलं आहे.

## मराठा मोर्चात दुःखद घटना,! कार्यकर्त्याचा हृदयविकाराने मृत्यू, मनोज जरांगेंनी व्यक्त केली हळहळ

मनोज जरांगे पाटील आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवली सराटीतून मुंबईच्या दिशेने निघाले असून आज ते जुन्नर येथे दाखल झाले.आंदोलनादरम्यान जुन्नरमध्ये बीडच्या सतीश देशमुख या मराठा कार्यकर्त्याचा हृदयविकाराने मृत्यू झाला.या घटनेवर मनोज जरांगे पाटील यांनी हळहळ व्यक्त करून कार्यकर्त्यांना धीर दिला.मराठा समाजाला आरक्षण मिळावं या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे अंतरवाली सराटीहून मुंबईच्या दिशेने निघाले आहे. २७ ऑगस्टला ते अंतरवाली सराटीतून निघाले. आज २८ ऑगस्ट रोजी ते पुणे जिल्ह्यातील शिवनेरी किल्ल्यावर दाखल झाले. दरम्यान जुन्नरमध्ये पोहोचताच एक दुःखद घटना घडली. एका मराठा आंदोलकाचा हृदयवविकारामुळे मृत्यू झाल्याने हळहळ



व्यक्त केली जात आहे.मनोज जरांगे पाटील हे हजारो मराठा कार्यकर्त्यांसह जुन्नर मुक्कामी होते. सकाळी कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह होता. मनोज जरांगे पाटील यांनी शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्याशी माध्यमांशी संवादही साधला यानंतर ते मुंबईकडे रवाना झाले.दरम्यान पान २ वर...

CMYK

संपादकीय...


# तू नही और सही. और नही!

भारतास बळ देणे हा चीनच्या वाढत्या आर्थिक ताकदीस रोखण्याचा मार्ग होता. आपण तो सोडण्यास तयार आहोत हे ट्रम्प कृतीतून भारताला नव्हे- चीनला सांगू इच्छितातअमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लादलेले ५० टक्के आयात शुल्क अखेर प्रत्यक्षात आले.त्यानंतर आपल्याकडील प्रतिक्रियांतील आदळआपट, संताप, राष्ट्रप्रेम इत्यादी भावनातरंगास उतारा म्हणून एक प्रश्न विचारणे अगत्याचे ठरते. ट्रम्प यांच्यासाठी भारत-अमेरिका, चीन-अमेरिका आणि रशिया-अमेरिका यांत सर्वाधिक आणि सर्वात कमी महत्त्वाचे काय? कोणतीही किमान शहाणी व्यक्ती या प्रश्नाचे उत्तर प्राधान्यक्रमाने चीन-अमेरिका, रशिया-अमेरिका आणि भारत-अमेरिका असेच देईल. ट्रम्प यांच्यासमोर चीनशी एकाच वेळी स्पर्धा आणि सहकार्याचे आव्हान आहे आणि रशियाबद्दल अमेरिकेपुढे त्या देशाचे चीन-संबंध आणि तेल विक्री ही समस्या आहे. त्या तुलनेत भारताकडून अमेरिकेस कसलीही डोकेदुखी नाही. म्हणजे आपल्याकडून जसा काही उपद्रवही नाही तशीच काही उपयुक्तताही नाही. अशा परिस्थितीत ट्रम्प यांनी भारतास कमी महत्त्व दिले आणि भारतावर ५० टक्के आयात शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला. याचा अर्थ रशियाला धमकावण्यासाठी आणि चीनला सहकार्याचा इशारा देण्यासाठी ट्रम्प यांनी भारताचा वापर केला. यावर आपली अधिकृत प्रतिक्रिया दोन प्रकारची आहे. परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी अमेरिकेवर (अप्रत्यक्ष) टीका केली आणि त्या देशाने घात केल्याची भावना त्यातून व्यक्त झाली. त्यावर प्रश्न असा की आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीत घात, कात्रजचा घाट, बोलणे एक-करणे एक, दुतोंडी भूमिका हे सर्व अध्याहृत असते हे जयशंकर यांस माहीत नाही, हे कोण म्हणेल. इस्रायल आणि पॅलेस्टिनादी प्रश्नांवर आपण असेच दुहेरी वागलेलो आहोत. त्यामुळे अन्यांनी आपल्याशी वागताना असेच काही केले तर उगाच शंख करण्याचे कारण नाही. म्हणजे जयशंकर यांची प्रतिक्रिया मोडीत निघते. त्याच वेळी राजनाथ सिंह, शिवराजसिंह चौहान आदींच्या प्रतिक्रियांतून अमेरिकेस धडा शिकवला जाण्याची गरज अमेरिकेचे नाव न घेता व्यक्त होते. शिवराजसिंह तर तृतीय नेत्र वगैरे उघडण्याची भाषा करतात. या अशा प्रतिक्रिया भक्तगणांतही उमटताना दिसतात. त्यावरून त्यांची हास्यास्पदता लक्षात यावी. त्यामुळे त्या दखलपात्र नाहीत. या प्रतिक्रियांच्या जोडीने आपली एक कृती मात्र निश्चित महत्त्वाची. ती म्हणजे अवघ्या काही दिवसांवर आलेली शांघाय परिषद. या परिषदेच्या निमित्ताने पंतप्रधान सात वर्षांनी चीनचा दौरा करणार असून रशियाचे व्लादिमिर पुतिन आणि चीनचे क्षी जिनपिंग यांच्याशी त्यांची बोलणी होतील. थोडक्यात अमेरिकेस पर्याय म्हणून चीन आणि रशिया असा सेतू उभारण्याचा आपला प्रयत्न राहील. यावर रोकडे भाष्य अत्यावश्यक.कारण हाच तर नेमका चीनचे क्षी जिनपिंग यांचा हेतू होता, आहे आणि राहील. भारतास अमेरिकेपासून दूर करणे ही चीनची कायमच मनीषा राहिलेली आहे. याचे कारण अमेरिकेने शीतयुद्धाच्या काळात ज्याप्रमाणे अफगाणिस्तानात घुसलेल्या सोव्हिएत रशियास नामोहरम करण्यासाठी पाकिस्तानला अभय दिले त्याप्रमाणे चीनच्या विस्तारवादास रोखण्यासाठी अमेरिका भारतास ढील देत आला. बराक ओबामा ते जो बायडेन यांनी यामुळेच भारत-रशिया व्यापारी संबंधांकडे काणाडोळा केला आणि भारतास सतत उत्तेजन दिले. ट्रम्प यांचा खाक्याच वेगळा. त्यांना हे बुद्धिबळ मान्य नाही. आपणासमोर चीनचे आव्हान असेल तर थेट चीनशीच व्यवहार करणे त्यांना योग्य वाटते. ते डीलमेकर आहेत आणि तसे म्हणवून घेण्यात त्यांना कमीपणा वाटत नाही. याच व्यवहारवादातून ते चीनला सौहार्दपूर्ण संबंधांचा संदेश देऊ पाहतात. त्यांच्यासाठी चीन दोन कारणांनी महत्त्वाचा. एक म्हणजे त्या देशाची वाढती आर्थिक ताकद आणि दुसरे म्हणजे चीन-रशिया संबंध. भारतास बळ देणे हा चीनच्या वाढत्या आर्थिक ताकदीस रोखण्याचा मार्ग होता. आपण तो सोडण्यास तयार आहोत हे ट्रम्प कृतीतून चीनला सांगू इच्छितात. भारतावर ५० टक्के आयात शुल्क ही ती कृती. ती ट्रम्प यांच्यासाठी तिहेरी फायद्याची आहे. एक म्हणजे अर्थातच चीन-अमेरिका मार्गातील काटे त्यामुळे दूर नाही झाले तरी यामुळे कमी होऊ शकतात. आर्थिक आव्हानास सामोरे जाणाऱ्या जिनपिंग यांनाही हेच हवे आहे. शिवाय त्यांच्यासाठी अमेरिकेच्या छडीने भारताच्या वाढत्या अपेक्षांनाही आळा घातला जातो. त्याच वेळी वेळ पडल्यास आपण रशियाच्या मित्रराष्ट्रांना हवे तितके दंडित करण्यास तयार आहोत असेही दाखवून देण्यात ट्रम्प यशस्वी ठरतात. याचा परिणाम भारतावर किती होईल याची फिकीर करण्याचे कोणतेही कारण ट्रम्प यांना नाही. पण भारतावर थेट ५० टक्के इतके आयात शुल्क लादल्यामुळे अन्य कोणते देश रशियाशी तेल व्यवहार करण्यास पुढे येणार नाहीत. म्हणजे भारताला शिक्षा केल्यास चीनही खूश आणि रशियाला इशारा असे दोन दोन फायदे ट्रम्प यांना मिळतात. वास्तविक आपल्यावर ५० टक्के आयात शुल्क लादणे ही शिक्षा आपल्याला नसून प्रत्यक्षात रशियाला आहे हे आपल्या मुत्सद्द्यांच्या ध्यानी आलेले दिसत नाही. तसे आले असते तर ट्रम्प यांच्या गंडावर फुंकर घालत आपण भारत आणि अमेरिका यांच्यात तात्पुरता, कामचलाऊ व्यापार करार करून घेतला असता. ते न झाल्याने या गंडसंघर्षात सर्वाधिक फायदा कोणाचा?चीन हे त्याचे उत्तर. एका बाजूने खरी स्पर्धक अमेरिकाही चीनला चुचकारणार आणि भारतासारखा कट्टर वैरी देशही प्रेमगीत आळवणार यापेक्षा मोठे यश क्षी जिनपिंग यांच्यासाठी दुसरे कोणते नसेल. पण वास्तव हे की कितीही आपण घट्ट मिठी मारली तरी चीन आणि रशिया हे एकत्रितरीत्यासुद्धा अमेरिकेस पर्याय होऊच शकत नाहीत. बरेच काही देऊ शकणाऱ्या ट्रम्प यांच्याशी जुळवून घेणे हा जर कमीपणा असेल तर बरेच काही काढून घेणाऱ्या, पहलगाम संघर्षोत्तर युद्धात पाकिस्तानची उघड पाठराखण करणाऱ्या, अवघ्या पाच वर्षांपूर्वी गलवान संघर्षात आपल्या २० जवानांना अकारण मारणाऱ्या चीनच्या क्षी जिनपिंग यांना चुंबाळण्यास काय म्हणणार? हा प्रतिप्रश्न या अशांच्या अज्ञानमूलक प्रश्नास उतारा ठरेल. हे असे काही गोंजारणे आपण कधी करत नाही, असेही नाही. अगली बार ही घोषणा ऐन निवडणुकीच्या धामधुमीत देणे हे गोंजारणे नव्हते तर काय?आणि दुसरी बाब अशी की ट्रम्प हे काही सत्तेचा अमरपट्टा घेऊन आलेले नाहीत. अमेरिकेत (सुदैवाने) दोन खेपेनंतर अध्यक्षपद पुन्हा मिळत नाही. म्हणजे ट्रम्प तात्पुरते आहेत. कायमची आहे आणि असणार आहे ती अमेरिका. तेव्हा आणखी जेमतेम चार वर्षे ज्यास सहन करावे लागणार आहे अशा ट्रम्प यांना हाताळण्याचा सोपा मार्ग काढणे महत्त्वाचे की अमेरिकेस दुरावणे महत्त्वाचे? ट्रम्प यांच्या आगामी चार वर्षांतील शेवटची अडीच वर्षे तशी निरुपयोगी. त्यात पुढील वर्षी २०२६ साली अमेरिकेत मध्यावधी निवडणुका होतील. असे असताना तंत्रज्ञान, संशोधन, अर्थकारण, समाजकारण, शिक्षण अशा अनेक आघाड्यांवर आपल्यासाठी चीनपेक्षा कित्येक पट महत्त्वाची आणि उपयुक्त असणाऱ्या अमेरिकेस अंतर देण्यात काहीही शहाणपण नाही. तू नही और सही, और नही तो और सही हे वैयक्तिक प्रेमसंबंधात ठीक. मुत्सद्देगिरीत मान-अपमान, तेव्हा-आता, खरे-खोटे, दुहेरी मापदंड वगैरे असे काहीही नसते. असतात ते फक्त हितसंबंध. त्यांचे रक्षण चीन नव्हे, अमेरिकाच करू शकते.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल, बीड येथे बुधवार, दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी किडनी विकार तपासणी शिबिर

**( अंगावर सुज येणे, लघवी कमी / लाल होणे, किडनी जंतू संसर्ग, डायलेसिस इ. उपचार. किडनी ट्रान्स्प्लांट विषयक मार्गदर्शन )**

बीड (प्रतिनिधी) जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल, बीड (जालना रोड, शाहू बँकेजवळ) येथे बुधवार, दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी २:०० वाजेपर्यंत किडनी विकार तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.किडनीच्या आजारांमध्ये सतत वाढ होत असून, आजार ओळखण्यात झालेला उशीर हा अनेक वेळा रुग्णांसाठी जीवघेणा ठरतो. ग्रामीण व शहरी भागातील अनेक रुग्ण वेळेत योग्य तपासणी व तज्ज्ञांचा सल्ला घेऊ शकत नाहीत. या पार्श्वभूमीवर हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.या शिबिरामध्ये खालील आजारांवर तपासणी व मार्गदर्शन केले जाणार आहे : अंगावर सुज येणे लघवी कमी / लाल होणे किडनी जंतुसंसर्ग रक्तदाबामुळे होणारे किडनी विकार डायलेसिससंबंधित समस्या किडनी ट्रान्स्प्लांट विषयक मार्गदर्शन शिबिरात उपस्थित राहणाऱ्या रुग्णांना आवश्यक त्या तपासण्या कमी दरात उपलब्ध करून देण्यात येतील. गरजू रुग्णांना महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत



डायलेसिस सेवा मिळणार आहे. तपासणीसाठी नोंदणी शुल्क फक्त ₹१००/- ठेवण्यात आले असून, जागा मर्यादित असल्यामुळे वेळेत नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.या शिबिरात राज्यातील सर्वात मोठ्या डायलेसिस सेंटर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आनंदषीजी हॉस्पिटल, अहिल्यानगर येथील सुप्रसिद्ध डॉक्टर, बीडचे भूमिपुत्र डॉ. गोविंद कासट, हे डायलेसिस सेंटरचे प्रमुख असून आपल्या जन्मभूमी बीडमध्ये रुग्णांना सेवा देतील.त्यांच्या मार्गदर्शनाखाली, तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांची सविस्तर तपासणी, उपचार व जीवनशैलीविषयक मार्गदर्शन करतील.वैद्यकीय सेवा दिवसेंदिवस महाग होत असल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना कमीत कमी पैशात सेवा उपलब्ध व्हावी या उदात्त हेतुने शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी किडनी आजार असणाऱ्या रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज बीडच्यावतीने करण्यात आले आहे.या शिबिरामुळे बीड शहर व परिसरातील अनेक रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून, ग्रामीण भागातील जनतेला तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन एकाच छताखाली उपलब्ध होणार आहे.जनतेने या शिबिराचा लाभ घ्यावा, अशी नम्र विनंती.नोंदणीसाठी संपर्क : ८२६२००९०९१

# राष्ट्रनिर्माता पुरस्कारा साठी प्रस्ताव पाठवण्याचे शिक्षकांना आवाहन

## रोटरी क्लब करणार शिक्षकांचा सन्मान

गेवराई, दि. २८ (प्रतिनिधी ) - कला, क्रीडा, आरोग्य, पर्यावरण, सांस्कृतिक, सामाजिक आदी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रोटरी इंटरनॅशनलच्या अखत्यारित असलेल्या गेवराई रोटरी क्लबच्या वतीने ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रनिर्माता पुरस्कार (नेशन बिल्डर अवॉर्ड ) शिक्षकांना दिला जाणार आहे . यासाठी इच्छुक सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या शिक्षकांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत .हा क्लब स्थापन झाल्यापासून गेल्या तीन महिन्यात सामाजिक कार्यात अग्रेसर असून विविध उपक्रमांमधून जनमानसात आपली प्रतिमा उमटविण्यात यशस्वी झाला आहे . यात पत्रकार बांधवांचा सिंहाचा वाटा आहे . ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षणतज्ज्ञ राधाकृष्णन यांचा जन्मदिन देशभर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो . या दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने गेवराई तालुक्यातील शिक्षकांना राष्ट्र निर्माता पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येणार आहे .यासाठी तालुक्यातील शिक्षकांनी आपले प्रस्ताव रोटरी क्लब गेवराई यांच्याकडे ४ सप्टेंबर २०२५ पर्यंत पाठवावेत . शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांच्या समितीकडून प्रस्तावाची छाननी करून सदर पुरस्कार वृत्तपत्रातून जाहीर केले जातील . एका भव्य शानदार समारंभात शिक्षण तज्ज्ञांच्या उपस्थितीत हे पुरस्कार वितरित केले जातील . सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, महावस्त्र, शाल, श्रीफळ, बुके देऊन सन्मान केला जाईल . गेवराई तालुक्यातील शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक, आरोग्य, राष्ट्रीय कार्य ,कला, क्रीडा ,सांस्कृतिक, पर्यावरण आदी विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या शिक्षकांना प्रेरणा मिळून त्यांच्या हातून राष्ट्र उभारणीचे कार्य उत्तम रीतीने व्हावे हा या पुरस्कारा मागील उद्देश आहे . तालुक्यातील पात्र शिक्षकांनी आपले प्रस्ताव कार्याच्या पुराव्यासह रोटरी क्लब ऑफ गेवराईचे अध्यक्ष प्रा. राजेंद्र बरकसे (९४२२७४ ४२६६ ) आणि सचिव प्रवीण जैन यांच्याकडे सादर करावेत, असे आवाहन रोटरी क्लब चे प्रोजेक्ट सर्विस चेअरमन धर्मराज करपे, समिती सदस्य गणेश कुलकर्णी, मनोज टाक, डॉ. किशन देशमुख, महेश मोटे ,डॉ. नागनाथ मोटे, जयराज कौराणी, उमेश बजाज आदींनी केले आहे.

# मराठा समाजाला आरक्षण मिळाल पाहिजे; पण ? रामदास आठवले



मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे ही रामदास आठवले यांची स्पष्ट भूमिकासर्व मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देणे शक्य नसल्याचे विधानमनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बैठक घ्यावी, असा सल्लाओबीसींवर अन्याय होणार नाही याची खबरदारी घेण्याचा ठराव महाबळेश्वर शिबिरात मंजूरआठवले गटाच्या सक्षमीकरणासाठी महाबळेश्वर येथे राज्यस्तरीय विचार मंथन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी उपस्थिती लावली.

या शिबिरात पक्ष वाढीच्या अनुषंगाने मंत्री आठवले यांनी राज्यातून आलेल्या आरपीआयच्या पदाधिकाऱ्यांना सूचना केल्या. याबरोबरच महायुती मधून या पुढील काळात होणाऱ्या निवडणुकीमध्ये जास्तीत जास्त आरपीआय पक्षाला महामंडळ आणि मंत्रिपदे मिळतील असा ठराव घेण्यात आला.

दरम्यान यावेळी मंत्री रामदास आठवले यांनी मराठा आरक्षणाबाबत मनोज जरागेंचा आंदोलनाबाबत या विचारमंथन शिबिरात ठराव मंजूर झाल्या असल्याचे सांगत आपली प्रतिक्रिया दिली आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळाल पाहिजे हे आमची पहिल्यापासून भूमिका आहे. मात्र मनोज जरांगे पाटील यांची मागणी आहे की सर्व मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्या.

सर्व मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देणे शक्य नाही. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी समाजावर अन्याय नको अशी आमची भूमिका आहे.

एखादी बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत मनोज जारंगे यांनी घ्यावी आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावरील टीका टाळावी असा सल्ला त्यांनी मनोज जरांगे पाटील यांना दिला आहे

पान १ वरून..

## एका समाजाचे आरक्षण दुसऱ्या समाजाला देणे योग्य नाही; मंत्री बावनकुळें

हे स्पष्ट करावे असेही बावनकुळे म्हणाले.आंदोलनाचा अधिकार सर्वांना आहे, मात्र गणेशोत्सवासारख्या महत्त्वाच्या सणात आंदोलन करणे योग्य नाही. चार दिवसांनी आंदोलन झाले असते तरी हरकत नव्हती असेही बावनकुळे म्हणाले.२०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना मराठा आरक्षणाचा ऐतिहासिक निर्णय झाला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणिउपमुख्यमंत्री अजित पवार सरकारही त्याच भूमिकेत आहे की, आरक्षण ओबीसींच्या कोट्यातून न देता स्वतंत्र द्यावे, असे त्यांनी सांगितले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षणासाठी खूप काम केले. त्यांच्यावर जातीवरून टीका करणे चुकीचे आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे, असे बावनकुळे म्हणाले.काँग्रेस नेत्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्हकाँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांची मराठा आरक्षणाबाबत भूमिका काय? नाना पटोले यांनी ओबीसी आरक्षण कमी करण्याच्या चळवळीला पाठिंबा दिला का? काँग्रेसने यावर ठराव घेतला का?ङ्खङ्ख असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. काँग्रेसच्या सर्व नेत्यांना ओबीसी समाजाच आरक्षण काढायचे आहे काय? ते दुसऱ्या समाजाला द्यायचा आहे काय? की मराठा समाजाला वेगळ आरक्षण दिले पाहिजे या बाबत कुठली भूमिका आहे हे स्पष्ट केले पाहिजे असेही बावनकुळे म्हणाले.

---

## आझाद मैदान आंदोलकांनी गजबजले;

परिसरात बॅरिकेड वाढविण्यात आले आहेत. आंदोलनाचे महाराष्ट्र राज्य समन्वयक वीरेंद्र पवार हे स्वत: मैदानात हजार होते. कार्यकर्त्यांमध्ये कमालीचा जोश आणि जल्लोष होता.पोलिसांनी पाच हजार लोकांना आझाद मैदानात परवानगी दिली आहे; पण त्यापेक्षा जास्त लोक मोर्चात सहभागी झाले आहेत. त्याबाबत आमची नियोजन समिती नियोजन करणार आहे. मोर्चासोबत वाहनेही मोठ्या प्रमाणात आहेत. ती रेल्वे स्थानक परिसरात उभी करण्यास सांगितले आहे.- वीरेंद्र पवार, समन्वयक,रेल्वे स्थानकात घोषणाबाजीएक मराठा लाख मराठा, जरांगे पाटील आगे पढो, आरक्षण आमच्या हक्काचे अशा घोषणा छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकावर धडकणारे कार्यकर्त्यांचे गट देत होते. मुंबईतील तसेच बाहेर गावाहून येणाऱ्या कार्यकर्त्यांनी आज स्थानक गजबजले होते. काही कार्यकर्ते स्थानकात बसले होते, तर काही कार्यकर्त्यांचे गट स्थानकातून बाहेर जात होते.आंदोलकाचा हृदयविकाराने मृत्यूआपटाळे (जि. पुणे) - मराठा आरक्षणाच्या लढ्यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील वरब या गावावरून शिवजन्मभूमी जुन्नर येथे आलेले मराठा आंदोलक सतीश ज्ञानोबा देशमुख (वय-४५) वर्ष यांचे गुरुवारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. किल्ले शिवनेरीच्या परिसरात त्यांच्या छातीत अचानक दुखू लागले. त्यामुळे त्यांना प्रथम जुन्नर येथील व नंतर नारायणगाव येथील रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.दुचाकीच्या धडकेत आंदोलक जखमीमंचर (जि. पुणे) - बीड जिल्ह्यातील आंदोलक प्रा. गणेश भीमराव धपाटे (वय ५३) हे पुणे- नाशिक राष्ट्रीय महामार्गावर कळंब (ता. आंबेगाव) येथे गुरुवारी मोटारसायकलस्वाराने धडक दिल्याने झालेल्या अपघातात गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर मंचर (ता. आंबेगाव) येथे एका खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. केज (जि. बीड) येथील वसंत ज्युनिअर कॉलेजमधील प्रा. धपाटे, गणेश चाळक यांच्यासह चार प्राध्यापक जरांगे यांच्या चलो मुंबई आंदोलनात सहभागी झाले होते.सोलापुरातून शेकडो आंदोलकसोलापूर - मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी पुकारलेल्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी शहरातील शेकडो मराठा आंदोलक मुंबईच्या दिशेने रवाना झाले. आता कुठे जायचे, मुंबईला जायचे, एक मराठा लाख मराठाच्या घोषणा देत गाड्यांचा ताफा घेऊन ते रवाना झाले. सकाळी १०.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात एकत्र जमत या आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला.यावेळी सकल मराठा समाज समन्वयक माऊली पवार यांनी सरकार मराठा समाजाला झुलवत ठेवत असल्याची टीका केली.नाशिकमधून तीन हजार वाहनेनाशिक - मराठा समाजाला इतर मागासवर्ग गटातून आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे २९ ऑगस्टपासून मुंबईत उपोषणाला बसणार आहेत. त्यासाठी मराठवाड्यातून मोठ्या संख्येने मराठा कार्यकर्ते पोचत असताना नाशिकमधून देखील अधिकाधिक मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन सहभागी होण्याचा निर्धार बैठकीत करण्यात आला.नाशिकमधून तीन हजार वाहनांचे नियोजन करण्यात आले आहे. नाशिक जिल्ह्यात दहा हजार चारचाकी स्टिकर, २५ हजार दुचाकी व रिक्षा स्टिकर तसेच पंधरा हजार झेंडे तयार करण्यात आले आहेत

---

## कार्यकर्त्याचा हृदयविकाराने मृत्यू,

मनोज जरांगे यांच्यासोबत असलेला कार्यकर्ता सतीश देशमुख याला हृदयविकाराचा झटका आला, त्याला तातडीने जुन्नरमधील रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. सतीश देशमुख हा बीडच्या केज तालुक्याली वरगावचा रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेवर जरांगे पाटील यांनी दु:ख व्यक्त केले आहे.बीड जिल्ह्यातील ६४ जणांचे बलिदानमराठा आरक्षणासाठी महाराष्ट्रात सर्वाधिक बलिदान देणारा जिल्हा अशी बीड जिल्ह्याची नोंद आहे. आतापर्यंत ६४ लोकांनी आरक्षणाच्या मागणीसाठी बलिदान दिले आहे. आजही मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षण आंदोलनात कायम सक्रीय असलेल्या सतीश ज्ञानोबा देशमुख (वय ४४) या बीड जिल्ह्यातील व्यक्तीचा ऱ्हदयविकाराने मृत्यू झाला.सतीश देशमुख यांचे वडिल ज्ञानोबा व भाऊ व्यंकटेश दोघेही सैन्य दलातून निवृत्त असल्याने लढाऊ बाणा त्यांच्या घरातच आहे. सतीश देशमुख मनोज जरांगे पाटील यांचे कट्टर समर्थक आहेत. दोन वर्षांपासून प्रत्येक आंदोलात सतीश देशमुख हिरीरीने सहभागी होते.. दरम्यान, मुंबईतील मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनासाठी काल बुधवारी (ता. २७) सतीश देशमुख हे गावातील सहकाऱ्यांसह पिकअप वाहनाने रवाना झाले. जरांगे यांच्या ताफ्यासोबतच त्यांचे वाहन होते. आज सकाळी नारायणगाव (ता. जुन्नर, जि. पुणे) येथे त्यांना ऱ्हदयविकाराचा तीव्र धक्का आला आणि त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, वडिल व भाऊ असा परिवार आहे. दरम्यान, मराठा आरक्षणासाठी २०१८ पासून जिल्ह्यातील ६४ समाज बांधवांनी आरक्षण मागणीसाठी बलिदान दिल्याची नोंद सरकारी दफ्तरी आहे. सतीश यांचे बंधू व्यंकटेश देशमुख यांनीही पुण्यात आंदोलनासाठी अनेक बैठका घेतल्या आहेतप्रश्न १: मनोज जरांगे पाटील सध्या कुठे आंदोलन करत आहेत?ते अंतरवली सराटीतून मुंबईच्या दिशेने निघाले असून सध्या जुन्नर मार्गावर आहेत.प्रश्न २: मृत्यू झालेल्या कार्यकर्त्याचे नाव आणि गाव कोणते?कार्यकर्त्याचे नाव सतीश देशमुख असून तो बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील वरगावचा रहिवासी होता.प्रश्न ३: मृत्यूचे कारण काय होते?हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांचा मृत्यू झाला.प्रश्न ४: मनोज जरांगे पाटील यांनी या घटनेवर काय प्रतिक्रिया दिली?त्यांनी हळहळ व्यक्त केली आणि आंदोलनकर्त्यांना धीर दिला.प्रश्न ५: आंदोलनाचा मुख्य उद्देश काय आहे?मराठा समाजाला आरक्षण मिळावे हीच मुख्य मागणी आहे.

# आजोबाच्या स्मृतिदिनी शिक्षक दिगांबर आर्दड यांनी दिली विद्यार्थी ग्रंथालयासाठी पाच हजार रुपयांची पुस्तके भेट!

बीड दि.२८ (प्रतिनिधी)- गेवराई शहरातील व तालुक्यातील श्रीपाद अंतर्वाला येथील मूळ रहिवासी असलेले शिक्षक श्री दिगांबर आर्दड सर यांनी आपले आजोबा कै. निवृत्ती लिंबाजी आर्दड यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून इतर विधीच्या होणाऱ्या व्यर्थ खर्चाला फाटा देऊन श्रीपाद आंतरवाला जिल्हा परिषद शाळेच्या बाल विद्यार्थी ग्रंथालयासाठी पाच हजार रुपये किंमतीच्या पुस्तकांचा संच भेट दिला. शाळेसाठी लागणारे शालेय पुस्तके भेट देऊन श्री दिगंबर आर्दड सर यांनी समाजासमोर एक नवीन आदर्श निर्माण केला. त्यांच्याप्रमाणे प्रत्येक नागरिकांनी आपल्या परिसरातील शाळांना आवश्यक शालेय साहित्य देऊन विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भवितव्य घडविण्यासाठी हातभार लावला पाहिजे असे आवाहन आध्यात्मिक रत्न श्री. विजय महाराज आर्दड यांनी गेवराई तालुक्यातील अंतरवाला जिल्हा परिषद शाळेत पुस्तक वाटपाच्या कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना केले. या वेळी व्यासपीठावर श्री. हरिभाऊ निवृत्ती आर्दड, सरपंच उमेश आर्दड,शाळेचे मुख्याध्यापक श्री शेळके सर, ज्ञानोबा बापू आर्दड, आसाराम भाऊ आर्दड,अंकुशराव आर्दड, तूळसिदास भाऊ आर्दड,



वैजिनाथ आर्दड, देवीदास जिजा आर्दड, नारायण वाकळे,मदन भाऊ आर्दड, मधुकर आर्दड, महादेव आर्दड, बंधू राजाभाऊ आर्दड, शाळेचे मुख्याध्यापक आदी मान्यवर उपस्थित होते. या बाबतीत अधिक माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील श्रीपत अंतरवाला येथील मूळ रहिवासी असलेले आदर्श शिक्षक दिगांबर आर्दड सर यांच्या आजोबांचा नुकताच स्मृतीदिन होता. आपले आजोबा कै. निवृत्ती लिंबाजी आर्दड यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने व्यर्थ खर्च न करता श्री दिगंबर आर्दड सर यांनी शाळेला पुस्तके भेट देण्याचा मानस त्यांच्या पत्नी सौ. मुक्ता आर्दड यांच्याकडे बोलून दाखवला. त्यांच्या पत्नी ह्याही शिक्षण क्षेत्रात शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. शिवाय या नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. त्यामुळे त्यांच्या पत्नी सौ. मुक्ता आर्दड मॅडम यांनी या स्तूत्य उपक्रमाला साथ दिली. त्यानुसार श्री दिगंबर आर्दड यांनी श्रीपाद अंतर्वाला जिल्हा परिषद शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्यावर थोर साधु, संत महापुरुषांच्या विचारांचा प्रभाव पडावा त्यांना चांगले शिक्षण मिळावे. ते सर्व मुले प्रगल्भ विचारवंत व्हावीत या विचाराने प्रेरित होऊन विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाला पुरक असलेली थोर वैज्ञानिक, थोर महापुरुष, थोर विचारवंत, प्रेरणादायी महाराष्ट्रातील स्त्रियांच्या जीवन संघर्ष, यशस्वी व्यक्तींच्या यशोगाथा असे जवळपास पाच हजार रुपये किंमतीच्या पुस्तकांचा संच शाळेस भेट दिला. यावेळी गावातील आध्यात्मिक रत्न श्री. विजय महाराज आर्दड यांनी सखोल मार्गदर्शन केले. या वेळी बोलताना म्हणाले की, या गावचे भूमिपुत्र आदर्श शिक्षक श्री दिगंबरआर्दड यांच्या आजोबा फार पुण्यवान व्यक्तिमत्वाचे होते. त्यांचाच वारसा सध्या ते चालवत आहेत. आपल्या आजोबाच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांनी इतर विधीला होणारा खर्च टाळून हा खर्च विद्यार्थ्यांसाठी सत्कार्मी लावला आहे. आज त्यांनी जिल्हा परिषद शाळेच्या बाल विद्यार्थी ग्रंथालयासाठी पाच हजार रुपये किंमतीची पुस्तके भेट दिली आहेत. शाळेसाठी लागणारे शालेय पुस्तके भेट देऊन श्री दिगंबर आर्दड सर यांनी समाजासमोर एक नवीन आदर्श निर्माण केला. त्यांच्याप्रमाणे प्रत्येक नागरिकांनी आपल्या परिसरातील शाळांना आवश्यक ते शालेय साहित्य देऊन विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भवितव्य घडविण्यासाठी हातभार लावला पाहिजे असे आवाहन करत उपस्थिततांना सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी काही निवडक मान्यवरांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वतः श्री दिगंबर आर्दड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शाळेचे मुख्याध्यापक श्री शेळके सर यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी श्री. हरिभाऊ निवृत्ती आर्दड, सरपंच उमेश आर्दड, ज्ञानोबा बापू आर्दड, आसाराम भाऊ आर्दड,अंकुशराव आर्दड, तूळसिदास भाऊ आर्दड, वैजिनाथ आर्दड, देवीदास जिजा आर्दड, नारायण वाकळे,मदन भाऊ आर्दड, मधुकर आर्दड, महादेव आर्दड, बंधू राजाभाऊ आर्दड, बालू तात्या आर्दड, परमेश्वर शितोळे, रघूनाथ शितोळे, बद्रीनाथ आर्दड, बप्पा आर्दड, जालिंदर वाकळे, माधव आर्दड, श्रीपाद आर्दड, अथर्व आर्दड यांच्यासह जेष्ठ नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भिनव विद्यालयात लाडक्या गणपती बप्पांचे ढोल ताशांच्या गजरात झाले आगमन



अपरळी प्रतिनिधी .ज्ञान प्रबोधिनी विकास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अभिनव विद्यालय नेहरू चौक परळी येथे संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ जब्दे व संस्थेचे सचिव साहेबराव फड यांच्या मार्गदर्शनाखाली श्री गणेशाचे स्थापना करण्यात आली . यावेळी ढोल ताशांच्या व लेझीमच्या गजरात गणपती बाप्पा यांचे मोठ्या जल्लोषात आगमन झाले दरवर्षीप्रमाणे याही वर्षी संस्थेचे कार्यवाहक तथा अभिनव विद्यालयाचे मुख्याध्यापक सूर्यकांत कातकडे यांच्या संकल्पनेतून अभिनव गणेश फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे . यावेळी शाळेच्या प्रवेशद्वारामध्ये संस्थेच्या कोषाध्याक्षा अंजलीताई कातकडे यांच्या हस्ते श्री गणेशाचे औक्षण करून स्वागत करण्यात आले .आज गणपती बाप्पांच्या आगमनाचे स्वागत लेझीम पथकाने आपल्या लेझीमनृत्य प्रकाराने मोठ्या जल्लोषात केले .यावेळी शाळेतील ५० मुलींच्या लेझीम पथकाने व ढोल पथकाने आपल्या लाडक्या गणरायाचे अभूतपूर्व स्वागत केले त्यानंतर गणपती बाप्पांची स्थापना व विधिवत पुजा संस्थेच्या कोषाध्याक्षा अंजलीताई कातकडे यांच्या शुभहस्ते झाली यावेळी देवबप्पांच्या हस्ते विधिवत पूजन करून गणपती बाप्पा यांची स्थापना व आरती बालगणेश भक्त चि .अभिनव कातकडे या बालभक्ताच्या हस्ते करण्यात आली त्यानंतर सर्वांना प्रसादाचे वाटप करण्यात आले यावेळी शाळेतील मुलींचे लेझीम पथक ढोल पथक सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते .

# श्रीगणेशा आरोग्याचा उपक्रमातून संपूर्ण राज्यात नागरिकांची आरोग्य तपासणी

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचा पुढाकार

मुंबई, दि.२८ : गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये ङ्गश्रीगणेशा आरोग्याचाफ या विशेष मोहिमेअंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत.या उपक्रमात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर यांचा संयुक्त सहभाग राहणार आहे. याशिवाय मोठ्या संख्येने गणेश मंडळे या उपक्रमात सक्रिय सहभागी झाले आहेत. मंडपांमध्ये किंवा जवळपास उभारण्यात येणाऱ्या शिबिरांमध्ये गणेशभक्त आणि स्थानिक नागरिक यांची मोफत आरोग्य तपासणी केली जात आहे.नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकताशिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती दिली जाणार असून, तपासणी दरम्यान आजार आढळणाऱ्या रुग्णांना पुढील उपचार संबंधित योजनांतर्गत मोफत उपलब्ध करून दिले जात आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमाचा उद्देश फक्त तपासणीपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकता निर्माण करणे हा देखील आहे.प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या कक्षाच्यावतीने गणेश मंडळांशी संपर्क साधून भव्य आरोग्य शिबिरे राबवली जात आहेत. यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेत नोंदणीकृत रुग्णालये, स्थानिक वैद्यकीय महाविद्यालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांचे तज्ज्ञ डॉक्टर आणि त्यांची संपूर्ण टीम सक्रिय सहभागी झाले आहेत.गणेशमंडळांकडून व्यापक जनजागृतीनागरिकांना या उपक्रमाची माहिती मिळावी यासाठी मागील आठवडाभर गणेश मंडळांकडून बॅनर, पत्रकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती सुरू आहे. परिणामी या शिबिरांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक आणि भाविक पुढे येत आहेत. आरोग्य तपासणीच्या माध्यमातून उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, कर्करोग आदी आजारांचे लवकर निदान करून वेळेत उपचार मिळण्याची सोय होणार आहे.गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची अभिनव कल्पना आहे. ङ्गश्री गणेशा आरोग्याचाफ या उपक्रमातून हजारो नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करण्याची संधी मिळत आहे. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या रुग्णांना पुढील मोफत उपचारही दिले जाणार आहेत. हा उपक्रम म्हणजे आरोग्यसेवेतील लोकाभिमुख आणि जनहिताचा उत्तम आदर्श ठरत आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख श्री रामेश्वर नाईक यांनी कळविले आहे.

## एशियन हज व उमरा टूर्सचे बीड येथील कार्यालयाचे उद्घाटन थाटात संपन्न.





एशियन टूर्स अँड ट्रॅव्हल्स , मुंबई च्या बीड़ शाखेचे उद्घाटन बलभीम चौक, एक मीनार मस्जिद जवळ औपचारिक स्वरूपात संपन्न झाले.उद्घाटन समारोह प्रसंगी उलेमा-ए-किराम यांचे सह बीड शहरातील प्रतिष्ठित व्यक्तींनी मोठ्या संख्येने उपस्थिती होती आणि टूर चे आयोजक श्री नसीर अहमद खान, श्री सैयद मज़हर अली व श्री सैयद उमर अली यांना शुभेच्छा दिल्या. उपस्थितांमध्ये में माजी आमदार, नगरपालिका सदस्य, व्यापारी, पत्रकार, डॉक्टर, वकील, शिक्षक आणि विभिन्न क्षेत्रातील सन्माननीय व्यक्ती उपस्थित होते.कंपनी ला हज आणि उमराह सेवेचा ३१ वर्षाचा प्रदीर्घ अनुभव आहे आणि आतापर्यंत ३१,५०० पेक्षा जास्त हज यात्री यांना सुविधा दिल्या आहेत. बीड़ मध्ये शाखा स्थापन झाल्याने स्थानिक हज यात्रि यांना हज आणि उमराह च्या संबंधीत अधिक सुविधा उपलब्ध होतील अशी आशा शाखेचे मार्गदर्शक श्री सय्यद मुख्तार अली व प्रमुख श्री सय्यद मजहर अली आणि श्री सय्यद उमर अली यांनी व्यक्त केली आहे.

# नागरिकांनी पावसाळ्यात सुरक्षिततेची दक्षता घ्यावी...

बीड प्रतिनिधी : सद्यस्थितीत मान्सून सक्रिय असून बीड जिल्ह्यात ठिकठिकाणी मुसळधारपावसामुळे नद्या, नाले, ओढे व पाणलोट क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह सुरू आहे. परिणामी अनेकठिकाणी पुलावरून पाणी वाहत असून नागरिकांकडून निष्काळजीपणामुळे अपघातांच्या घटना घडत आहेत.सदर परिस्थितीचा विचार करून जिल्हा प्रशासनामार्फत सर्व नागरिकांना खालीलप्रमाणे आवाहन व दक्षतासूचना करण्यात आल्या आहेत.नागरिकांनी पावसाळ्यात पुढील प्रमाणे दक्षता घ्यावी. मुसळधार पाऊस सुरू असतांना अनावश्यकप्रवास टाळावा. पुराचे पाणी पुलावरून वाहत असल्यास पूल ओलांडू नये. पुराच्या पाण्यात पोहण्याचा प्रयत्नकरू नये. पाण्याच्या खोलीचा अंदाज नसेल तर पाण्यात जाऊ नये.

पुलावरून किंवा नाल्यांवरून पाणी वाहतअसल्यास पूर पाहण्यासाठी नागरीकांनी तेथे गर्दी करु नये, तसेच नदीकाठ, ओढ्याकाठ किंवा धोकादायकठिकाणी सेल्फी / फोटो काढण्याचा मोह टाळावा. नदीकाठच्या गावातील नागरिकांनी दक्ष रहावे, नदीच्या पाणीपातळीत वाढ होत असल्यास नदीपात्रापासून दूर जावे. पावसाच्या वेळी मुलांना नाल्याजवळ, नदीकाठी किंवाधरण परिसरात जाण्यास परवानगी देऊ नये. धरण क्षेत्र, बंधारे व जलाशय परिसरात पाण्याचा विसर्ग होवूशकतो, त्यामुळे त्या ठिकाणी गर्दी करणे टाळावे.

वीज पडत असल्यास झाडाखाली किंवा मोकळ्या जागेत थांबूनये. पुराच्या वेळी पाळीव प्राण्यांना बांधून ठेवू नये. सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. ग्रामपंचायत, पोलीसपाटील, तलाठी किंवा स्थानिक प्रशासनाकडून मिळणाऱ्या सूचनांचे पालन करावे. पावसामुळे घरात पाणीशिरण्याची शक्यता असल्यास वीजपुरवठा बंद करून सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे, तसेच जमिनीखालूनजाणाऱ्या विद्युत तारांपासून सावध राहावे.दुषित पाणी पिऊ नये, पिण्याचे पाणी उकळून प्यावे व जेवणाआधीहात स्वच्छ धुवून घ्यावे. पूर ओसरल्यानंतर परिसर स्वच्छ करण्यासाठी प्रशासनास सहाय्य करावे व परिसरस्वच्छ ठेवावा, रोगराई पसरू नये याकरिता आरोग्य विषयक खबरदारी घ्यावी. कोणत्याही आपत्कालीनपरिस्थितीत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी (१०७७) त्वरित संपर्क साधावा.नागरिकांनी या कालावधीत निष्काळजीपणा टाळून आपल्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे.

जिल्हाप्रशासन सर्वतोपरी दक्ष आहे. मात्र आपत्ती टाळण्यासाठी नागरिकांचे सहकार्य व सतर्कता अत्यावश्यक आहे, असेशिवकुमार स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापनप्राधिकारी, बीड यांनी कळविले आहे.

## पोलीस जमादार गायक राजेश राजगुरेंनी रसिक श्रोत्यांची मने जिंकली

### महाराष्ट्रातील गायक, कलाकारांना चित्रपटसृष्टीत संधी मिळायला हवी - एस.एम.युसूफ

बीड (प्रतिनिधी) - आपल्या महाराष्ट्रात कलाकारांची फार मोठी खाण आहे. मग ती अभिनय क्षेत्रात असो की गीत संगीत क्षेत्रात. प्रश्न आहे तो फक्त योग्य वेळी, योग्य संधी व व्यासपीठ मिळण्याचा, ते मिळाले पाहिजे. गायक आणि कलाकारांना आपल्यातील गुण दाखविण्याची सर्वात जास्त संधी मिळते ती चित्रपटसृष्टीत.

आपल्या महाराष्ट्रातील मराठमोळ्या गायक आणि कलाकारांना ती मिळाली पाहिजे, असे मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी व्यक्त केले आहे.गेल्या अनेक वर्षांपासून विदर्भाचे किशोर कुमार म्हणून गायन क्षेत्र आणि युट्युब वर गाजत असलेले बुलढाणा जिल्ह्यातील पोलीस जमादार गायक राजेश राजगुरे यांना नुकतेच नाशिक



जिल्ह्यातील परशुराम सायखेडकर नाट्यगृह, शालिमार, नाशिक येथे घेण्यात आलेल्या सदाबहार गीत संगीत कार्यक्रमात आयोजकांकडून मानाने बोलविण्यात आले होते. यावेळी त्यांनी दिवंगत किशोर कुमार यांचे सारा जमाना, हसीनों का दिवाना हे गीत गाऊन रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून टाकले. त्यांचे हे गाणे पूर्ण झाल्यानंतर रसिकांनी टाळ्या आणि शिट्ट्यांनी संपूर्ण नाट्यगृह अक्षरशः डोक्यावर घेतले होते. हे पाहता महाराष्ट्रातील कलाकार आणि गायकांना योग्य वेळी चित्रपटसृष्टीत संधी मिळावी असे मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी व्यक्त केले आहे.

## श्री.धनंजय यादव आणि श्री. मनीष दळवी यांची महाराष्ट्र राज्य काजू मंडळाच्या संचालक पदी नियुक्ती

मुंबई, दि. २८ ऑगस्ट २०२५ महाराष्ट्र शासनाने राज्यातील काजू उद्योगाच्या विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र राज्य काजू मंडळावर दोन नवे स्वतंत्र संचालक नियुक्त केले आहेत. शासन निर्णयान्वये श्री. धनंजय यादव यांना सहकारी काजू प्रक्रिया प्रकल्प महासंघाचे प्रतिनिधी आणि श्री. मनीष प्रकाश दळवी यांना काजू क्षेत्रातील तज्ज्ञ संचालक म्हणून नेमले आहे.राज्यातील काजू पिकाच्या विकासासाठी १६ मे २०२३ रोजी महाराष्ट्र राज्य काजू मंडळाची स्थापना झाली होती. सुरुवातीला मंडळात १२ संचालक आणि १ सदस्य सचिव होते; परंतु २२ ऑगस्ट २०२५ रोजी सुधारित रचनेत स्वतंत्र संचालकांची संख्या ४ वरून ११ केली गेली.

या बदलामुळे विविध क्षेत्रांना व्यापक प्रतिनिधित्व मिळाले असून मंडळ अधिक सर्वसमावेशक बनले आहे.श्री. धनंजय यादव हे दापोली येथील आर.



व्ही. बेलोसे एज्युकेशन फाउंडेशनचे सभापती असून शिक्षण क्षेत्रातील कार्यामुळे प्रसिद्ध आहेत.

तसेच त्यांचा हॉटेल वोल्गा रेसिडेन्सी आणि कोकण काजू प्रक्रिया उद्योग हा दापोलीतील महत्त्वाचा व्यवसाय आहे, ज्यामुळे स्थानिकांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

त्यांच्या निवडीवर स्थानिक समाजाने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.तसेच, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील श्री. मनीष प्रकाश दळवी हे काजू पिकाच्या उत्पादनक्षमता वाढवणे, प्रक्रिया तंत्रज्ञान सुधारणा आणि निर्यात क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी उपयुक्त ठरणारे तज्ज्ञ आहेत.

श्री. यादव व श्री. दळवी यांची नियुक्ती केल्याबद्दल संस्थेचे कार्यवाह डॉ. दशरथ भोसले, जानकीताई बेलोसे, सुनिता बेलोसे, अनंत सणस, डॉ.दीपक हर्डीकर, प्राचार्य सीए डॉ. भारत कऱ्हाड, सीए संदीप कोचरे, डॉ. सीए. एम. एस. जाधव, वंजारी महासंघाच्या प्रदेशाध्यक्ष डॉ. सौ. सुवर्णा कराड यांसह अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.या नियुक्त्यांमुळे शेतकरी, उद्योजक, सहकारी संस्था व तज्ज्ञ या सर्व घटकांचा सहभाग अधिक बळकट होईल आणि महाराष्ट्रातील काजू उद्योगाचा विकास वेगाने घडून येईल.

# रुग्णसेवेत ईश्वर शोधणारा सच्चा रुग्णसेवक नरसिंग मामा चन्नया डॉ. संजय तांदळे

बीड(प्रतिनिधी) : बीड जिल्हा शासकीय रुग्णालयातील रक्त पेढी विभागात परिचर तथा मुकादम पदावर कार्यरत असलेले नरसिंग चन्नय्या( मामा ) यांचा जिल्हा रुग्णालयातील चाळीस वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर नुकतेच दि. ३१ जुलै २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. रुग्णालयात मामा म्हणूनच ते सर्वांचे परिचित होते. रुग्णालयात येणाऱ्या बेघर, वंचित ,गोरगरीब ग्रामीण भागातील रुग्णासह सर्वांचीच अस्ताविक पणे चर्चा करून गरजवंताला ते स्वतः रुग्णांची चिठ्ठी काढून ऍडमिट करेपर्यंत मदत करून रुग्णांची काळजी घेत होते. वेळप्रसंगी चालता न येणाऱ्या वयोवृद्ध रुग्णास स्वतः उचलून घेऊन संबंधित रुग्णास दुसऱ्या मजल्यावर ऍडमिट केलेले आहे. तसेच अपघाती रुग्णांसह इतर रुग्णांना देखील रक्ताची गरज भासल्यास ते संबंधितांना तातडीने रक्त उपलब्ध करून देऊन अनेकांचे प्राण देखील त्यांनी वाचवले आहेत. बेघर जिव्हाळा निवारा केंद्रातील वयोवृद्ध निराधारांना शासकीय रुग्णालयात ऍडमिट केल्यानंतर ते स्वतः रुग्णांची काळजी घेत होते. बेघर जीव्हाळा केंद्रातील वयोवृद्ध रुग्णांचा रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाल्यास रुग्णाचे पोस्ट मार्टम होईपर्यंत मदत करत होते. असे अनेक



अनुभव बीड जिल्हा शासकीय रुग्णालयाचे अशासकीय सदस्य डॉ. संजय तांदळे यांनी रुग्णसेवक नरसिंग मामा चेन्नया यांच्या सेवापुर्ती निमित्त दि. २६ ऑगस्ट २०१८ रोजी बेघर निवारा केंद्रामध्ये व्यक्त केले. जिल्हा पोलीस वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर ,शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक वसुदेव मिसाळ, जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त कर्मचारी श्याम मार्कंडे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले . बेघर जीव्हाळा केंद्राच्या वतीने नरसिंग चेन्नया मामाचा सपत्नीक शाल पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले की,जिव्हाळा केंद्रातील निराधारांच्या सेवेसाठी मी सदैव तत्पर राहील त्यांच्या पत्नी स्वामी समर्थ च्या सेवेकरी सौ .वरलक्ष्मी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रस्ताविक जीव्हाळा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, सूत्रसंचालन व्यवस्थापक राजू वंजारे, तर आभार काळजीवाहक छायाताई सरोदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या शेवटी जिव्हाळा केंद्रातील निराधारांना नरसिंग मामा यांनी सपत्नीक स्नेहभोजन वाटप करून त्यांच्या समवेत स्नेह भोजनाचा त्यांनी आस्वाद घेतला.

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप-प्रादेशिक अधिकारीदर बुधवारी बीडमध्ये

बीड प्रतिनिधी: बीड जिल्ह्यातील उद्योजकांच्या तसेच औद्योगिक संघटनांच्या अडी-अडचणी / समस्यावरील चर्चा करणेसाठी व निवारण करणेसाठी उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जालना हे आठवड्याच्या प्रत्येक बुधवारी, जिल्हा उद्योग केंद्र, संचेती बिल्डिंग, गुड लक हॉटेल जवळ, एम.एस.ई.बी. ऑफिस समोर, जालना रोड, बीड येथे उपलब्ध असतील.

असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ छत्रपती संभाजीनगरचे प्रादेशिक अधिकारी यांनी कळविले आहे.



गुणवत्तेचा ध्यास असणारे राम वनवे यांची हुतात्मा देवराव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ता. पाटोदा जि. बीड येथे प्राचार्य पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा मितृभूमी प्रतिष्ठान परिवाराच्या वतीने शाल, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे दिसत आहेत.



पत्रकार नारायण सावंत, संजय सावंत, मोहन सावंत, मु. पोयरे, गोंदापुरवाडी तालुका देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग यांच्या घरी विराजमान झाले गणरायमूर्तिकार : अक्षय कवले, सजावट : गणेश मोहन सावंत व गणेश संजय सावंत अभि सावंत

# तर आज चित्र वेगळं असतं, ती आमची मोठी चूक झाली, विनोद पाटलांचं मनोज जरांगेबद्दल मोठं वक्तव्य

मराठा समाजाला आरक्षण मिळावं, यासाठी मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा अमरण उपोषण करणार आहेत. त्यासाठी मराठा आंदोलक मोठ्या संख्येनं मुंबईच्या दिशेनं निघाले आहेत. मुंबईच्या आझाद मैदानावर मराठा बांधवांचं आंदोलन होणार आहे.या पार्श्वभूमीवर बोलताना आता विनोद पाटील यांनी मोठं वक्तव्य केलं आहे.नेमकं काय म्हणाले विनोद पाटील? जरांगे पाटील हे माझे भाऊ आहेत. मित्र आहेत. त्याच काळात त्यांनी निवडणुकीतून माघार घेतली नसती आणि निवडणूक लढवली असती तर आज आमचं चित्र वेगळं असतं, असं विनोद पाटील यांनी म्हटलं आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की. आम्ही निवडून आलो असतो, पडलो असतो, पण राज्यामध्ये एक राजकीय दबदबा राहिला असता.



आज निवडणुका निघून गेल्या आहेत.निश्चितपणे त्यांनी निवडणुकीतून माघार घ्यायला नको होती. मात्र त्यावेळी मिस्टेक झाली आणि आमची मोठी चूक झाली. आम्ही जर निवडणूक लढवली असती, कमी जास्त मत पडली असती, परंतु त्या -त्या भागामध्ये आमचं एक नेतृत्व तयार झालं असतं आणि राजकीय पक्षांना सुद्धा दखल घ्यावी लागली असती, असंही यावेळी विनोद पाटील यांनी म्हटलं आहे.माझी भावना एकच आहे, मी न्यायालयाची लढाई लढतो आहे. मुंबई हायकोर्टात आम्ही जिंकलो परंतु सुप्रीम कोर्टात हरलो. मनोज जरांगे पाटील सुद्धा रस्त्यावरची लढाई लढत आहेत.

त्यामुळे आमच्या दोघांचा उद्दिष्ट एकच आहे. की मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे. रस्त्यावरची लढाई सुद्धा महत्त्वाची आहे आणि न्यायालयीन लढाई सुद्धा महत्त्वाची आहे. समितीला मुदतवाढ देण्याची पद्धत आहे.

ते जितक्या वेळेस मागतील तितक्या वेळेस द्यावी लागेल, अशी प्रतिक्रिया यावेळी विनोद पाटील यांनी दिली आहे.दरम्यान सरकारनं मनोज जरांगे पाटील यांच्या आझाद मैदानावरील आंदोलना फक्त एक दिवसांची परवानगी दिली आहे.

त्यावर देखील विनोद पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. कुठलेही आंदोलन असेल तर पोलीस प्रशासन, किंवा कोणतंही प्रशासन त्यांच्या सोयीप्रमाणे अटी घालत असतात. न्यायालयाचा निर्देश आहे, त्यामध्ये अटी घातल्या आहेत, हा त्यांचा अधिकार आहे. परंतु प्रश्न हा आहे की, आंदोलन एक दिवस असेल, एक महिना असेल हा संपूर्ण कायद्याचा विषय आहे. यामध्ये राज्य सरकार काय भूमिका घेईल? हे त्यांच्याकडूनच स्पष्ट झाल्यावर कळेल, असं यावेळी विनोद पाटील यांनी म्हटलं आहे.

# भाजपचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील व जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या यांच्या हस्ते श्री गणेशाच्या दिव्यमूर्तीची स्थापना.

बीड प्रतिनिधी.बीड जिल्हा भारतीय जनता पार्टी कार्यालयाच्या ऑफिसमध्ये आज भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष शंकर भाऊ देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली श्री गणेशाची स्थापना करण्यात श्री गणेशाची स्थापना करताना मुख्य यजमान म्हणून भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या हस्ते श्री गणेशाचे शास्त्र युक्त पद्धतीने वैदिक मंत्राच्या साह्याने विधिवत पूजा करून ही स्थापना करण्यात आली यावेळी येथे उपस्थित असलेले भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष शंकर भाऊ देशमुख साहेब तसेच देविदास नागरगोजे साहेब व नागरगोजे साहेब तसेच शांतिनाथ डोरले संकेत सानप कृष्णा खेंडेकर गणेश लांडे केशव बडे साहेब अनिल चांदणे डॉक्टर वनवे साहेब जिल्हा परिषद माजी अध्यक्ष मीराताई गांधले मॅडम राजू शहाणे अमोल वडकिले राजेश चरखा भालचंद्र कुलकर्णी बाबुराव परळकर व पत्रकार संजय देवा कुलकर्णी पिपळगावकर सह योगेश



नाकाडे सह इतर सर्व पदाधिकारी व गणेश भाविक भक्त व भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी व श्री गणेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते श्री गणेशाची स्थापना विधिवत पूजा करण्यासाठी श्री वेदशास्त्र संपन्न विपुल रत्नपारखी देवा उपस्थित होते श्री गणेशाची स्थापना मोठ्या उत्साहामध्ये आणि मोठ्या आनंदाच्या भक्तीमय वातावरणामध्ये व पवित्र वैदिक मंत्राच्या जयघोषात संपन्न झाली आणि श्री गणेशाकडे सर्वांच्या वतीने प्रार्थना करण्यात आली की बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र चांगला पाऊस पडो सर्व लोक सुखाने गुना गोविंदाने नांदावे अशी प्रार्थना भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा अध्यक्ष यांच्या वतीने व उपस्थित सर्व गणेशभक्त यांच्या वतीने श्री गणराया कडे प्रार्थना करण्यात आली ..

# पो.नि.श्री.शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा,यांचे आदेशावरुन

## १०५ किलो गांजा ७५० ग्रॅम ज्याची बाजार भाव किंमत २१,१५,०००/- रु वाहन ,मुद्देमाल जप्त करुन आरोपीस पोलीस कोठडी

बीड प्रतिनिधी-दनांक २६/०८/२०२५ रोजी मा. पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे आदेशावरुन पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर व त्यांची टिम पोलीस स्टेशन पाटोदा गुरनं २५६/२०२५ कलम ३३१ (४), ३०५ बी.एन.एस. अन्वये दाखल घरफोडीच्या गुन्हयाचा तपास करत असतांना सकाळी ०७.०० वा सुमारास एक मारुती सुझुकी सियाज गाडी ही अती वेगाने राजुरी वरुन खालापुरी जाणारे रोडने गेलेली दिसली. तेंव्हा काही वेळातच सदर टिमला माहिती मिळाली की, मौजे हनुमानवस्ती ता.जि.बीड येथे एका कारचा अपघात झाला आहे. त्यावरुन पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर व त्यांची टिम घटनास्थळी जावुन सदर वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये अंमली पदार्थ गांजा सदृस्य वास येत असल्याने व त्यामध्ये काळया रंगाचे पाच गोण्या दिसल्याने सदर बाबत माहिती मा. पोलीस निरीक्षक श्री. बंटेवाड व पोलीस निरीक्षक श्री. मारुती खेडकर पोलीस ठाणे बीड ग्रामीण यांना फोनव्दारे दिली.त्यावरुन मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक श्री. बंटेवाड, पोनि श्री. खेडकर हे सर्व टिमसह घटनास्थळी आले व पाहणी केली असता सदर वाहनामध्ये एकुण १०५ किलो गांजा ७५० ग्रॅम ज्याची बाजार भावाने



किंमत २१,१५,०००/- रु व सदर वाहन असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.त्यावेळी सदर वाहनातील आरोपी नामे १) बाबासाहेब विश्वनाथ दहातोंडे रा. चांदा ता. नेवासा व २) दत्तु मुरलीधर सकट रा. टाकळी खंडेश्वरी ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना सदर गांजा बाबत विचारपुस केली असता त्यांनी तो गांजा चांदा ता. नेवासा जि. अहिल्यानगर येथुन विक्रीसाठी आणल्याचे सांगीतले. तसेच त्यांनी पोलीसांची गाडी राजुरीवरुन रायमोहाकडे जात असल्याचे पाहिल्याने पोलीस आपल्याला पकडतील या भितीने ते वाहन पळुन घेवुन जात होते, असे त्यांनी सांगीतले. त्यावरुन वरील दोन्ही आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन बीड ग्रामीण येथे गुरनं २८२/२०२५ कलम ८ (क), २० (ब), (क) व कलम २८१, १२५ (अ) बी.एन.एस. अन्वये गुन्हा दाखल झालेला असुन आरोपी नामे दत्तु मुरलीधर सकट यास दिनांक ०१/०९/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मिळालेली आहे. सदर गुन्हयाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. बाळराजे दराडे हे करत आहेत.सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री. नवनीत कॉंवत मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. सचिन पांडकर, मा.उपविभागीय पोलीस अधीकारी श्री. बाळकृष्ण हनपुडे-पाटील, पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड स्थानिक गुन्हे शाखा, बीड व पोनि श्री. मारुती खेडकर यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे, पोलीस उप निरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार सोमनाथ गायकवाड, अनंत मस्के, राहुल शिंदे, मनोज जोगदंड, सतिश मुंडे, संभाजी भिल्लारे, अशपाक सय्यद, अर्जुन यादव, अंकुश वरपे, मनोज परजने, नितीन वडमारे, सिद्धार्थ मांजरे यांनी केली.

# धक्कादायक वृत्त ! चतुरवाडी बालविवाह घडकीस

अंबाजोगाई। प्रतिनिधी तालुक्यातील चतुरवाडी येथे तीन वर्षांपूर्वी एका अल्पवयीन मुलीचा विवाह झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी ग्रामविकास अधिकारी बंडु जांभळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून सहा जणांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.बंडू जांभळे हे ग्रामपंचायत जोगाईवाडी येथे नेमणुकीस असून चतुरवाडीचे कामकाजही तेचपाहतात. त्यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, चतुरवाडी येथील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विवाह दि. २८ मार्च २०२२ रोजी आमोल मोतीराम मदने (रा. फरदपूर, ता. रेणापूर, जि. लातूर) याच्यासोबत लावण्यात आला. विवाहावेळी मुलगी अल्पवयीन असूनही बालविवाह झाल्याचे तपासात स्पष्ट झाले. तक्रारीनंतर ग्रामपंचायत कर्मचारी अन्सर हमीद पठाण, आशा कार्यकर्ती छाया खांडेकर,अंगणवाडी मदतनीस सुमन पवार व लिपिक अविनाश वाकडे यांनी चौकशीदरम्यान दिलेल्या माहितीतूनही हा विवाह झाल्याची खात्री पटली. यावेळी पिडीत मुलीचे आई-वडील, मुलाचे वडील मोतीराम मदने, आई संजीवनी मदने हे सर्व विवाहास उपस्थित होते. हा विवाह संजय बाबुराव गोडबोले (रा. जोगाईवाडी) यांच्या हस्ते लावण्यात होता. अल्पवयीन मुलगी असल्याचे माहिती असतानाही विवाह लावून देण्यात आल्याने पती आमोल मदने, मुलीचे आई-वडील, मुलाचे आई-वडील मोतीराम व संजीवनी मदने तसेच विवाह लावणारे संजय गोडबोले अशा सहा जणांविरुद्ध अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ना. पंकजाताई मुंडे यांच्या रामटेक निवासस्थानी पर्यावरणपूरक गणरायाचे थाटात आगमन

## श्रीं ची उत्साहात झाली प्रतिष्ठापना ; सामान्य माणूस, वंचितांसाठी काम करण्यासाठी शक्ती मिळावी यासाठी केली प्रार्थना

मुंबई-प्रतिनिधीराज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या रामटेक या शासकीय निवासस्थानी पर्यावरणपूरक गणरायाचे आज मोठ्या थाटात वाजतगाजत आगमन झाले. ना. पंकजाताई मुंडे व कुटूंबियांनी श्रींची उत्साहात प्रतिष्ठापना केली. पंकजाताई मुंडे यांच्या निवासस्थानी दरवर्षी गणेश चतुर्थीच्या दिवशी श्रीची प्रतिष्ठापना केली जाते. स्वतः पंकजाताई मुंडे या उत्सवाची सर्व तयारी करतात. गणपतीची मुर्ती आणण्यापासून ते त्याची स्थापनाकरण्यापर्यंत त्या स्वतः बारकाईने लक्ष घालतात, यावर्षी त्यांनी गणपतीची आरास अतिशय आकर्षक व सर्वांचे लक्ष वेधून घेणारी केली आहे. सकाळी ढोल ताशांच्या निनादात गणरायाचे आगमन झाले, त्यानंतर विधीवत पूजनाने ना. पंकजाताई मुंडे, त्यांचे चिरंजीव आर्यमान पालवे यांनी श्रींची प्रतिष्ठापना केली. यावेळी माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे, अगस्त्य खाडे व कुटूंबिय उपस्थित होते.सामान्य माणूस अन् वंचितासाठी काम करण्याची शक्ती मिळोबाप्पाने प्रत्येक संघर्षावर मात करून पुढे जाण्यासाठी शक्ती दिलीय. यापुढील काळात देखील सामान्य माणसासाठी, वंचितासाठी सातत्याने काम करता यावं एवढी शक्ती



मला मिळावी अशी प्रार्थना आपण बाप्पाकडे केली असल्याचं ना. पंकजाताई मुंडेंनी माध्यमाशी बोलताना सांगितलं. दरम्यान, पर्यावरणपूरक गणेश मूर्त्या स्थापन करण्याबाबत त्या म्हणाल्या, मी आता पर्यावरण मंत्री असले तरी फार पूर्वीपासून माझ्या घरी मातीचाच गणपती मी आणते. तथापि पीओपी च्या मूर्त्याशक्यतो आणूच नका, आणल्याच तर त्याचे विसर्जन पर्यावरण विभाग आणि न्यायालयानेदिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार करावं ही लोकांकडून अपेक्षा व्यक्त आहे असं त्या म्हणाल्या

# शेळ्या चारणाऱ्या वृद्धाचा खुन

बीड। प्रतिनिधीबीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यात शेळ्या चारण्यासाठी शेताकडे निघालेले शेख इब्राहिम बासू (वय ६०) या वृद्धाची कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण करून खून केल्याची धक्कादायक घटना गुरूवार (दि. २८) रोजी सकाळी दहाच्या सुमारास घडली आहे.यासंदर्भात मिळालेली अधिक माहिती अशी की, वडवणी तालुक्यात असलेल्या उपळी गावातून स्वतःच्या शेतात शेळ्या चारण्यासाठी निघालेल्या शेख इब्राहिम बासू वय ६० वर्ष यांना गावातीलच दोन ते तीन जणांनी रस्त्यात शेळ्या-अडव्या आल्याचे कारण पुढे करत कुऱ्हाडीच्या दांड्याने जबर मारहाण केली ही घटना गुरूवार दि. २८ रोजी सकाळी दहाच्या सुमारास घडली आहे.या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या शेख इब्राहिम यांना प्राथमिक उपचारासाठी वडवणी रुग्णालयात घेऊन गेले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना तात्काळ बीड जिल्हा रुग्णालय



येथे पाठवले होते मात्र त्यांचा बीड येथे येण्यापूर्वीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे. दरम्यान या घटनेची माहिती कळताच वडवणी पोलीस जिल्हा रुग्णालयात दाखल झाले असून शवच्छेदन सुरू होते.

# मनोज जरांगे जर ओबीसीमधूनच आरक्षण मागत असतील तर. ; देवेंद्र फडणवीस

मुंबई वृत्तसेवा: मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली हजारो मराठा बांधवांनी किल्ले शिवनेरीवरून मुंबईच्या दिशेने कूच केले आहे. आरक्षण घेतल्याशिवाय माघारी फिरायचे नाही, असा निर्धार करत जरांगे आणि त्यांचे समर्थक गुरुवारी दुसऱ्या दिवसाचा प्रवास करत आहेत.मुंबई उच्च न्यायालय आणि मुंबई पोलिसांच्या निर्देशानुसार, शुक्रवार, २९ ऑगस्ट रोजी जरांगे यांच्यासह सुमारे ५,००० मराठा आंदोलक आझाद मैदानात उपोषणाला बसणार आहेत. येत्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हे आंदोलन वाहतूक व्यवस्था आणि कायदा सुव्यवस्थेसाठी आव्हान ठरू शकते, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.या घडामोडींवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी माध्यमांशी संवाद साधला. भाजप नेते कृपाशंकर सिंह यांच्या घरी गणपती बाप्पाचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी मराठा आरक्षण आंदोलन, ओबीसी समाजाचे साखळी उपोषण आणि राहुल गांधी यांच्या बिहारमधील मताधिकार यात्रेवर भाष्य केले.मराठा आणि ओबीसी समाजाच्या हितांचे रक्षण करूमराठा आरक्षण आंदोलनाबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ङ्क्षमराठा आणि ओबीसी समाजाला माझी विनंती आहे की, सरकार दोन्ही समाजांच्या हिताचा विचार करेल. दोन्ही समाजांना समोरासमोर आणण्याचा आमचा हेतू नाही. ओबीसी समाजावर कोणताही अन्याय होणार नाही आणि मराठा समाजाचे प्रश्नही आम्हीच सोडवू. आतापर्यंत मराठा समाजाचे प्रश्न आमच्या सरकारनेच सोडवले आहेत. दुसऱ्या कोणत्या पक्षाने हे प्रश्न सोडवले, हे त्यांनी सांगावे.फ्रजरांगे यांच्या मागणीवर फडणवीसांचे स्पष्टीकरणमनोज जरांगे यांच्या मागणीबाबत फडणवीस म्हणाले, ङ्क्षलोकशाहीत आंदोलन करण्याचा सर्वांना अधिकार आहे. जोपर्यंत आंदोलन लोकशाही मार्गाने होईल, तोपर्यंत आम्हाला कोणतीही हरकत नाही. आम्ही चर्चेतून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करू. पण मराठा समाजाला १० टक्के स्वतंत्र आरक्षण देऊनही त्यांची



ओबीसी प्रवर्गातून आरक्षणाची मागणी आहे, हे मला समजत नाही. ओबीसी प्रवर्गात आधीच ३५० जाती आहेत. तरीही आम्ही त्यांच्या मागण्या समजून घेऊ.फ्रमहाराष्ट्रात मराठा आरक्षणाचा प्रश्न का जटील?आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी () १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय देशभरात स्वीकारला गेला आणि इतर राज्यांतील आंदोलने शमली. मात्र, महाराष्ट्रात मराठा समाजाचे समाधान का होत नाही, यावर फडणवीस म्हणाले, ङ्क्षइतर राज्यांमध्ये आरक्षणाची मानसिकता स्वीकारली गेली, पण आपल्याकडे ती तयार झाली नाही. त्यामुळे हा प्रश्न जटील आहे. आमच्या १० टक्के आरक्षणाचा निर्णय न्यायालयातही टिकला आहे, याकडेही लक्ष वेधायला हवे.फ्रफडणवीसांचे आवाहनफडणवीस पुढे म्हणाले, ङ्क्षलोकशाहीत मागण्या मांडण्याचा सर्वांना अधिकार आहे. आम्ही त्याला सामोरे जाऊ. आंदोलन लोकशाहीच्या चौकटीत झाले तर आम्ही उपाय आणि चर्चा करू. उच्च न्यायालयाने आंदोलनाची चौकट ठरवून दिली आहे, ती पाळावी, अशी विनंती मी करतो.फ्रया आंदोलनामुळे मुंबईत गणेशोत्सवाच्या काळात वाहतूक आणि कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने प्रशासनासमोर मोठे आव्हान आहे. सरकार आणि आंदोलकांमधील चर्चेतून हा प्रश्न सुटेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पारंपरिक वाद्य वाजवून सण साजरे करा-आ.प्रकाश सोळंके

## पोलीस ठाणे माजशार गणेशोत्सव व ईद ए-मि २०२५ पंतता मिटी बैठकसुंदरराव सोळंके महाविद्यालय पहगाव विंत डार्थ्यांचा सत्कार।

माजलगाव-प्रतिनिधीआरोग्यास अतिशय घातक असलेल्या डी जे बाजूला सारून पारंपरिक वाद्यांनी सर्व सन उत्सव साजरे करा असे आव्हान आ प्रकाशदादा सोळंके यांनी तर शासनाने डी जे वर बंदी घातली असून सर्व गणेश मंडळाने याचे काटेकोर पालन करावे डी जे बंद म्हणजे बंदच राहणार आहेत येणारा गणेशोत्सव व ईद ए मिलाद सर्व नागरिकांनी शांततेत व उत्साहात साजरे करावे असे आव्हान शहर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी शांतता समितीच्या बैठक प्रसंगी सर्व नागरिकांना केले. येणाऱ्या गणेशोत्सव व ईद ए मिलाद या सणांच्या पार्श्वभूमीवर माजलगाव शहर पोलीस स्टेशनच्या वतीने लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालयात सोमवारी आयोजित केली होती या बैठकीला माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके, उपविभागीयपोलीस अधिकारी शैलेश गायकवाड, ना तहसीलदार लक्षीमन धस, एमएसइबी चे कार्यकारी उपअभियंता विजयकुमार वसावे, नपचे विग्नेश मुंडे आदी ची प्रमुख उपस्थिती होते. या वेळी नागरिकांनी विचारले काही प्रश्नांवर बोलताना आ प्रकाश दादा सोळंके म्हणाले की, शहरा सह परिसरातील अवैद्य धंदे पूर्णपणे बंद आहे त्या मुळे सर्वत्र शांतता आहे,समाजाने ठरवलं तर सर्व अवैद्य धंदे बंद होऊ शकतो शहरातील नाल्या, रोडवरील लाईट, रस्ते आदी सर्व कामे पूर्ण करण्याच्या मी अगोदरच त्या त्या विभागाला सूचना केल्या आहेत सद्याचा तरुण दिशाहीन झाला आहे डी जे चे फ्याड त्यांच्या डोक्यात आहे डी जे मुळे वृद्ध नागरी, लहान मुले यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन अनेकदा दुर्दैवी घटना घडत आहेत त्या मुळे सण उत्सवाच्या वेळी पारंपरिक वाद्य वाजवून सन साजरे करण्याची गरज आहे तर शहरपोलीस स्टेशन चे




कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी राहुल सुर्यतळ यांनी काही सूचना केल्या बीड चे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात डी जे वाजवण्यास बंदी आहे डी जे बंद म्हणजे बंद त्या मुळे कोनीही याचे उल्लंघन करणार नाही याची खबरदारी घ्यावी गणेश मंडळांनी दोन समाजात तेड निर्माण होईल अशी कुठलेही कृत्य करू नये गणेशोत्सव व ईद ए मिलाद हे येणारे सन आनंदाने साजरे करा व कायदा आणि सु व्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सर्व नागरिकांनी नेहमी सारखे सहकार्य करावे. काल शांतता समितीच्या वतीने तालुक्यातील नीट मध्ये यश संपादन करून उतुंग भरारी घेऊन आपल्या पालकांचे व तालुक्याचे नाव उंचावणाऱ्या अकरा यशस्वी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा आ प्रकाश सोळंके व उपविभागीय पोलीस अधिकारी शैलेश गायवाड यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या शांतता समिती च्या बैठकीला जयदत्त नरवडे, अच्युतराव लाटे, सलीम बापू, कचरू तात्या खळगे, डॉ मुजीब सौदागर, धम्मानंद साळवे आदी सह शहरातील सर्व जाती धर्माचे नागरिक व गणेश मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार पीएसआय प्रबतराव मुंढे यांनी व्यक्त

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक संजय रघुनाथ हांगे यांनी ओम ऑफसेट, क्रांतीनगर, तहसीलच्या मागे, डी.पी.रोड बीड, ता.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक साप्ताहिक अक्षर वार्ता कार्यालय,क्रांतीनगर, तहसील कार्यालयाच्या मागे, डी.पी.रोड, बीड ता.जि.बीड पिन -४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले आहे. संपादक : संजय रघुनाथ हांगे,मो.९७६६२६८४१५ Email : aksharwartanews@gmail.com

The Newspaper Printed, Published and Owend by SANJAY RAGHUNATH HANGE and Printed at OM OFFSET, Kranti Nagar, Behind Tahasil Office, D.P. Road, Tq, Dist. Beed 431122 (Maharashtra) and published at office Of DALY SAPTAHIK AKSHAR VARTA , Kranti Nagar, Behind Tahasil Office, D.P. Road, Tq, Dist. Beed 431122 (Maharashtra) Editor : SANJAY RAGHUNATH HANGE Mo : 9766268415